**अलोक जत्रटकर,**
जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर येथे १८ नोव्हेंबर १९६२ रोजी स्थापन झालेले शिवाजी विद्यापीठ यंदा आपल्या स्थापनेचा हीरकमहोत्सव साजरा करीत आहे. विद्यापीठाला मराठा स्वराज्याचे महान संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. छत्रपती राजाराम महाराज, डॉ. बाळकृष्ण आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सी. रा. तावडे यांच्या तळमळीतून आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या अथक प्रयत्नांतून साकारलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमागे दक्षिण महाराष्ट्राच्या प्रादेशिक आणि विशेषत: शैक्षणिक-सांस्कृतिक गरजा पूर्ण करणे हा एक प्रमुख उद्देश होता. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र तीन जिल्ह्यांमध्ये पसरलेले आहे. आज कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांतील २७७ संलग्न महाविद्यालयांतून सुमारे अडीच लाख विद्यार्थी शिकत आहेत. 'नॅक' (बेंगळूर) यांच्याकडून करण्यात आलेल्या चौथ्या पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यापीठास ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'A++' मानांकन प्राप्त झाले आहे. यावरुन शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तबच झालेले आहे.



# गुणवत्तेचा मानदंड उंचावताच!


महाराष्ट्राचा हा प्रदेश समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सामाजिक-सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आधुनिक आणि सामाजिक सुधारणावादी नेतृत्वाखाली हे शहर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला दक्षिण-पश्चिम महाराष्ट्रासह शेजारील कर्नाटकातील सर्व वर्ग आणि समुदायांसाठी तसेच उत्तरेकडील भागांसाठी शैक्षणिक, प्रागतिक संधींचे केंद्रबिंदू बनले होते. आपल्या अभिनव 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून शिक्षण जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी झटणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचीही ही भूमी आहे. १९६२ च्या शिवाजी विद्यापीठ कायद्याद्वारे विद्यापीठाची स्थापना झाली तेव्हा, विद्यापीठासमोर ठेवलेल्या उद्दिष्टांमध्ये ग्रामीण तरुणांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, प्रादेशिक वाढ आणि विकास सुनिश्चित करण्यासाठी विज्ञान आणि मानवतेच्या क्षेत्रात मूलभूत आणि उपयोजित संशोधन करणे समाविष्ट होते. १९६२ मध्ये विद्यापीठाने ३४ संलग्न महाविद्यालये आणि परिसरातील पाच पदव्युत्तर विभाग यामध्ये मिळून सुमारे १४,००० विद्यार्थ्यांसह कार्य करण्यास प्रारंभ केला.

आज विद्यापीठाच्या आवारात ३४ पदव्युत्तर विभाग, १९ केंद्रे, दहा अध्यासने आणि दोन स्कूल यासह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात संलग्न महाविद्यालयांची संख्या २७७ आहे. यामधील एकूण विद्यार्थी संख्या २ लाख ५० हजारांपर्यंत पोहोचली आहे. विद्यापीठात विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखा अशा चार प्रमुख विद्याशाखांमध्ये शिक्षण दिले जाते.

सुरुवातीच्या दोन दशकांमध्ये उच्च शिक्षणाच्या विस्तारावर आणि कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यांतील विविध भागांमध्ये नवीन महाविद्यालयांची स्थापना करण्यासाठी प्रयत्न केले गेले. या टप्प्यात 'लोकांपर्यंत शिक्षण नेऊन' विद्यापीठाने आपला पाया मजबूत केला. १९८०च्या दशकात अधिक विस्तार झाला. विशेषत: अभियांत्रिकी, शिक्षण, व्यवस्थापन आणि औषधनिर्माण यासारख्या व्यावसायिक विद्याशाखांची वाढ झाली.

विद्यापीठाच्या अलीकडच्या टप्प्याला 'शैक्षणिक उत्कृष्टतेसाठीच्या पाठपुराव्याचे फलित' असे म्हणता येईल. जागतिक मानकांनुसार मोजमाप करण्यासाठी अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा वाढवण्यासाठी अनेक पावले उचलण्यात आली आहेत. मूलभूत विज्ञान शाखांव्यतिरिक्त औद्योगिक रसायनशास्त्र, अंतराळ विज्ञान, पर्यावरण विज्ञान, जैव-रसायनशास्त्र, रेशीम शेती, पॉलिमर रसायनशास्त्र आणि संगणक विज्ञान यासारख्या वेगाने उदयास येत असलेल्या क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षण आणि संशोधनाच्या नवीन क्षेत्रांचा शोध घेऊन हे साध्य केले जात आहे. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, सायबर सिक्युरिटी, जैव-तंत्रज्ञान, बी.एस्सी.-एम.एस्सी. इकॉनॉमिक्स, ऑनलाईन एमबीए यासारख्या आधुनिक शाखांच्या बरोबरीनेच सामाजिक वंचितता व समावेशी अभ्यास, ग्रामविकास, लोककला आदी महत्त्वाच्या विषयांच्या अंगानेही अभ्यास व संशोधनास प्रोत्साहनाचे धोरण विद्यापीठाने स्वीकारले आहे. विद्यापीठाने तीनही जिल्ह्यांमध्ये विद्यापीठ-उद्योग संवाद कक्षही स्थापन केले आहेत.

...पान ४ वर






...पान ३ वरून



# गुणवत्तेचा मानदंड उंचावतोच!

बदलत्या काळाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कला आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखाही सज्ज होत आहेत. आजीवन अध्ययन व निरंतर विकास केंद्र आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत राबविण्यात येणारे विस्तारित उपक्रम या बदलाचे निदर्शक आहेत. ''शिवाजी युनिव्हर्सिटी मेरिट स्कॉलरशिप' नावाची एक अनोखी योजना विद्यापीठाने सुरू केली आहे. ज्याद्वारे संल न महाविद्यालयांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच, विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागांसह संलग्न महाविद्यालयांतील अध्यापक, विद्यार्थी यांच्यासाठी विविध संशोधन फेलोशीपही सुरू केल्या आहेत. त्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूदही केली आहे. अशी योजना सुरू करणारे हे भारतातील एकमेव विद्यापीठ असावे.

युजीसी, डीएसटी, डीबीटी इत्यादी राष्ट्रीय महत्त्वाच्या निधी एजन्सींकडून मिळालेल्या भरीव अनुदानामुळे विद्यापीठाच्या उत्कृष्टतेसाठीच्या ध्यासपूर्ण प्रयत्नांना मान्यताच मिळाली आहे. विद्यापीठाच्या मान्यतेचे आणखी एक सूचक म्हणजे देशातील प्रमुख संस्थांसोबतचे सहकार्य. शिवाजी विद्यापीठाने देश-विदेशांतील विद्यापीठांसह विविध संशोधन संस्था, उद्योग-व्यवसाय यांचेसमवेत सामंजस्य कराराद्वारे हातमिळवणी केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षम परीक्षापद्धतीचे मा. कुलपती महोदयांनी वेळोवेळी कौतुक केले आहे. विद्यापीठाने सामान्य प्रशासन, विवेकपूर्ण आर्थिक व्यवस्थापन आणि निधी देणाऱ्या एजन्सींशी सौहार्दपूर्ण संबंध याद्वारे उच्च दर्जाचे पालन केले आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या (MHRD) राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (NIRF) ने जाहीर केलेल्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाने १००-१५० या बँडमध्ये सातत्याने स्थान कायम राखले आहे. प्रादेशिक आकांक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रामुख्याने स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाने आता ही प्रादेशिक सीमा ओलांडून ग्लोबलतेची कास धरली आहे आणि ती भारतातील उच्च शिक्षण आणि संशोधनातील प्रमुख संस्थांपैकी एक म्हणून उदयास आली आहे.

**दृष्टीक्षेपात शिवाजी विद्यापीठ**

- नॅक (बेंगळूर) यांचेकडून ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'A++' मानांकन (२०२१)
- आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणित विद्यापीठ
- एनआयआरएफ रँकिंगमध्ये १०१-१५० बँडमध्ये स्थान कायम
- शिवाजी विद्यापीठाच्या सेक्शन-८ कंपनीस मान्यता
- मटेरियल सायन्सच्या संशोधनात भारतीय विद्यापीठात प्रथम स्थानी (करन्ट सायन्स-२०१८)
- क्यूएस वर्ल्ड रँकिंग-२०२३मध्ये ५०१-५५० बँडमध्ये आणि दक्षिण आशिया रँकिंगमध्ये १३१व्या स्थानी
- संशोधनाचा एच-इंडेक्स १२५
- एकूण पेटंट ६३
- ३७ प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय संस्थांसमवेत सहकार्य करार
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसमवेत ११९ सामंजस्य करार
- युरोपियन युनियन व नॅक यांच्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पामध्ये संयुक्त भागीदारी
- 'रुसा' पुरस्कृत सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्स व सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन्स ही दोन महत्त्वाची केंद्रे कार्यान्वित
- आठ आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची 'ग्यान' उपक्रमांतर्गत व्याख्यानमाला यशस्वी
- सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस या विषयासाठी स्वतंत्र फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर
- सेक्शन-८ कंपनीअंतर्गत सेंटर फॉर इनक्युबेशन अँड इनोव्हेशन कार्यान्वित
- अकॅडमी फॉर अकॅडेमिक अॅडमिनिस्ट्रेटर्स प्रस्थापित
- डीएसटी अंतर्गत FIST, PURSE, SAIF, STUTI, SERB इत्यादी महत्त्वाच्या योजना मंजूर
- ए.आय.सी.टी.ई. पुरस्कृत TEQIP-III उपक्रम प्राप्त झालेले महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ
- संलग्न महाविद्यालयांच्या गुणवत्ता वर्धनासाठी 'अग्रणी महाविद्यालय योजना' राबविणारे देशातील एकमेव विद्यापीठ
- आधुनिक अकाऊंट कोडची निर्मिती; महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राज्यातील अन्य बहुतांश विद्यापीठांकडूनही स्वीकार.
- विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन व स्वाभिमान या गुणांचा विकास करण्यासाठी 'कमवा आणि शिका' योजना सन १९६८पासून कार्यान्वित; विद्यार्थिनींचाही समावेश
- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी विविध योजना, शिष्यवृत्त्या, सामाजिक समावेशन व समुपदेशनासाठी विशेष केंद्रे कार्यरत.
- पश्चिम घाटातील पर्यावरणीय समस्यांबाबत संशोधन व जनजागृती
- विस्तीर्ण लीड बॉटेनिकल गार्डन प्रस्थापित; अनेक दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन व संशोधन
- विद्यापीठ परिसरांतील जलाशयात ३० कोटी लिटर पाण्याचे संवर्धन; जलस्वयंपूर्ण विद्यापीठ म्हणून लौकिक
- जैवविविधतेने समृद्ध परिसर; पक्ष्यांच्या १२३ प्रजातींसह ६४ प्रकारच्या फुलपाखरांचे आढळस्थान

पुढारी



कोल्हापूर : पन्हाळा येथे शिव-पावन प्रेरणा मोहिमेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील आदी.

# छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन संस्कृती जाणून घ्यावी : कुलगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जी माती आणि माणसे वाचून छत्रपती शिवाजी महाराज यांनी इतिहास घडविला. तो आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती जाणून घ्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स कॉलेज चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित पन्हाळा-पावनखिंड शिव-पावन प्रेरणा मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पन्हाळा येथील संजीवन नॉलेज सिटीचे चेअरमन पी. आर. भोसले यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव एन. आर. भोसले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. जैन, उपप्राचार्य सपाटे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा.डॉ. अभय जायभाये यांनी आभार मानले. सकाळी मोहिमेस पन्हाळा येथील शिवा काशीद यांच्या पुतळ्यास डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार वाहून सुरुवात झाली. यानंतर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

30 DEC 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीमेला पन्हाळा येथील शिवा काशिद यांच्या पुतळयास कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झेंडा दाखवण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य जाणून घ्या

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पावनखिंड मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज यांनी इतिहास घडविला, तो आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनीही आपली संस्कृती जाणून घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पन्हाळा येथे केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीमेत ते बोलत होते. पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीम शिवाजी विद्यापीठामार्फत गेल्या पाच वर्षांपासून आयोजित करण्यात येते. दुसऱ्या दिवशी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी या मार्गावरील विविध वाड्या-वस्त्यांवरील सामाजिक जीवनाची बाजू जाणून विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन केले. या पावनखिंडीत विद्यार्थ्यांना इतिहासातील अनेक गोष्टींची जाणीव होणार आहे. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी इतिहासातील व्यक्तींमधील पर्यावरणविषयक जाणिवांविषयीमाहिती दिली. यंदाच्या मोहिमेत कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे १५० स्वयंसेवक आणि शिक्षक व कर्मचारी सहभागी आहेत. मोहिमेचे संयोजन डॉ. पी. आर. माळी, संग्राम मोरे, आर. आर. पाटील, विजय नागाळकर, आनंदा घोडे, सुरेखा आडके आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केले. मोहिमेस पन्हाळा येथील शिवा काशिद यांच्या पुतळयास पुष्पहार वाहून सुरुवात केली. यानंतर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळयासही हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

30 DEC 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मर्दानी खेळांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हावा

## सचिन सूर्यवंशी; विद्यापीठात 'वारसा' लघुपटाचे सादरीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून कोल्हापूरला मर्दानी खेळाची गौरवशाली परंपरा आहे. मात्र, ही परंपरा काळाच्या ओघात नष्ट होण्याच्या आधी मर्दानी खेळांचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करावा, असे आवाहन फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सूर्यवंशी यांच्या फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त 'वारसा' लघुपटाचे विद्यापीठात सादरीकरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

सूर्यवंशी म्हणाले, 'वारसा' लघुपटामध्ये शिवकालीन संदर्भासह मर्दानी खेळांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे झालेले हस्तांतरण चित्रबद्ध



**कोल्हापूर : 'वारसा' लघुपटाला फिल्मफेअर पुरस्कार मिळाल्याबद्दल दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शिवाजी जाधव.**

केले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही विद्यापीठाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात विद्यार्थ्यांचे योगदान मोठे असते. वस्ताद आनंदराव ठोंबरे यांचे लोकसंस्कृती व मर्दानी खेळ जनमानसात रुजवण्यात योगदान आहे.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, एमएसएमएसचे तांत्रिक सल्लागार मिलिंद पाटील, गार्डन क्लबच्या कल्पना सावंत, पल्लवी कुलकर्णी, चित्रकार स्वप्निल पाटील उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. समृद्धी पाटीलने पाहुण्यांचा परिचय करून दिला. जावेद तांबोळी यांनी आभार मानले.

लोकमत




# आरोग्य, आनंददायी 'लोकमत' महामॅरेथॉन

लोकमत महामॅरेथॉन यंदा सहाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. मॅरेथॉनच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत आरोग्यासाठी पळा आणि पळत राहा, असा संदेश देत ही मॅरेथॉन अधिकाधिक व्यापक होत आहे. पहिल्या वर्षापासून कोल्हापूर विभागामध्ये शिवाजी विद्यापीठ या मॅरेथॉनचा एक भागीदार आहे, याचा मोठा आनंद आहे. मॅरेथॉनचा विद्यापीठातील ट्रॅक हा सहभागींसाठी प्रेक्षणीय आणि आल्हाददायक ठरतो. पळण्याचा उत्साह येथे वृद्धिंगत होतो. त्याचप्रमाणे यंदा 'आजादी का अमृतमहोत्सव' या संकल्पनेअंतर्गत भारतीय स्वातंत्र्ययोद्धे' यांना ही महामॅरेथॉन समर्पित आहे. आपल्या प्रत्येकाच्या पदकावर हे स्वातंत्र्ययोद्धे विराजमान असणार आहेत, हा एक अभिनव उपक्रम आणि स्वातंत्र्य जपण्यासाठी प्रतिबद्ध होण्याचा संदेश यातून दिला जातो आहे, ही बाबही समाधान देणारी आहे. या महामॅरेथॉनमध्ये सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि त्यानंतरच्या कालखंडातही आरोग्य जपण्यासाठी धावत राहावे.

- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# महावीर अध्यासनास चौगुलेंतर्फे देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी आप्पासाहेब चौगुले यांनी दहा हजार रुपयांची देणगी दिली. त्यांना रकमेचा धनादेश अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांच्याकडे दिला. त्यांनी दिलेल्या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. देणगी प्राप्तिकर सवलतीस पात्र असून, अध्यासनासाठी मदत करावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले आहे.

सकाळ



कोल्हापूर : 'होरायझन' नियतकालिकाने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल प्रा. लोखंडे यांचा सत्कार करताना प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत इतर मान्यवर.

# नियतकालिक स्पर्धेत कोरे अभियांत्रिकी प्रथम

वारणानगर, ता. २९ : येथील तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीच्या (ऑटोनॉमस) 'होरायझान' नियतकालिकाने शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१८-१९ शैक्षणिक वर्षात व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक मिळविला.

प्राचार्य डॉ. एस. व्ही आनेकर म्हणाले, 'अभियांत्रिकीचे विद्यार्थी असूनही ते किती सृजनशील, निर्मितीक्षम व सामाजिक बांधीलकी जोपासणारे आहेत हे दाखवून दिले.' संस्थाध्यक्ष, डॉ. विनय कोरे व प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी अभिनंदन केले. संपादक डॉ. बी. टी. साळोखे, सहसंपादक, प्रा. पी. व्ही. लोखंडे, प्रा. डॉ. एन. एस. धाराशिवकर, प्रा. गणेश कांबळे, डॉ. मार्क मोनीस,डॉ. के. आय. पाटील व प्रा. आर. बी. पाटील, ऋषिकेश खाडे, निकिता टर्नर, राकेश पाटील व समितीने परिश्रम घेतले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २०१८-१९ शैक्षणिक वर्षाचा निकाल जाहीर झाला. स्पर्धेसाठी नियतकालिकांचे एकूण स्वरूप, छपाई, मांडणी इत्यादींचे मूल्यमापन त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून विद्यापीठामार्फत करून घेतले जाते. यशस्वी पहिल्या तीन महाविद्यालयांना सन्मानचिन्हे आणि विद्यार्थ्यांना व्यक्तिगत पारितोषके व प्रशस्तीपत्र देऊन प्र-कुलगुरूंच्या हस्ते गौरविले.

30 DEC 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आशियातील प्रश्नांकडे मानवतावादातून पाहावे

## आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक जतीन देसाई : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आशियाई उपखंडातील विविध देशांमधील परस्परसंबंध तणावग्रस्त झाले आहेत. या देशांतील प्रश्नांकडे भारतासह जगाने मानवतावादी भूमिकेतून पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक जतीन देसाई यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'आशिया खंडातील आंतरराष्ट्रीय संबंध' याविषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तर विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते. रशिया-युक्रेन युद्धामुळे आशिया




शिवाजी विद्यापीठात बुधवारी राज्यशास्त्र अधिविभागात आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक जतीन देसाई यांचे व्याख्यान झाले. यावेळी डावीकडून सुखदेव उंदरे, विलास शिंदे, प्रकाश पवार उपस्थित होते.

प्रत्यक्षपणे प्रभावित झाला आहे. अफगाणिस्तान, इराण, म्यानमार या देशांमध्ये अस्वस्थ वातावरण आहे. त्याचाही परिणाम या समस्त विभागावर होतो आहे. आशियातील आंतरराष्ट्रीय संबंध संतुलित राखण्यामध्ये भारताने नेहमीच प्रभावी भूमिका बजावली आहे. यापुढील काळातही या समस्यांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहण्याची नितांत गरज असल्याचे देसाई यांनी सांगितले. जागतिकस्तरावर घडणाऱ्या प्रत्येक मोठ्या घटनेचा सूक्ष्मपणे अभ्यास केला, तर त्याचा संबंध प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अर्थकारणाशी दिसत असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# आशियाई देशांतील प्रश्नांकडे मानवतावादी भूमिकेतून पाहणे आवश्यक : जतीन देसाई



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना जतीन देसाई.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

आशियाई उपखंडातील विविध देशांमधील परस्परसंबंध तणावग्रस्त झाले आहेत. या देशांतील प्रश्नांकडे भारतासह जगाने मानवतावादी भूमिकेतून पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक जतीन देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागात यावर्षी नव्याने सुरू झालेल्या 'आंतरराष्ट्रीय संबंध व सुरक्षा'या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांतर्गत 'आशिया खंडातील आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर देसाई यांचे विशेष व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते.

देसाई म्हणाले, रशिया युक्रेन युद्धामुळे आशिया प्रत्यक्षपणे प्रभावित झाला आहे. आशियाई देशांच्या राजकीय, आर्थिक सहसंबंधांवर याचा परिणाम दिसून येतो. अफगाणिस्तान, इराण, म्यानमारमध्ये अस्वस्थ वातावरण आहे. आशियातील आंतरराष्ट्रीय संब्रंध संतुलित राखण्यामध्ये भारताने प्रभावी भूमिका बजावली आहे. यावेळी डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# कॉलेज ऑफ आर्किटेक्चरला गोल्ड मेडल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या आर्किटेक्चर विभागाच्या पदवी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या निहारिका साळुंखे हिने ९१.९२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळाला असून सुवर्णपदक विजेता ठरलेली आहे. तसेच विद्यापीठात १० पैकी याच महाविद्यालयातील ६ विद्यार्थी मेरीट लिस्टमध्ये आले. यामध्ये पद्मश्री पाटील (८९.८४), कल्याणी वाघमोडे (८७.९२), विश्वा मिराशी (८९.४६), विकी माने (८७.१५), डिंपल सुरेश (८७.०७) यांचा समावेश आहे. त्यांना प्राचार्य संदीप दिगे, संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांचे प्रोत्साहन मिळाले.

पुण्यनगरी

# विद्यापीठ संघात न्यू कॉलेजच्या विद्यार्थिनी

**कोल्हापूर :** जयपूर येथे होणाऱ्या वेस्ट झोनल हॅण्डबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये ऋतुजा कळंत्रे, एकता पाटील, साक्षी नाळे, पूजा जाधव या विद्यार्थिनींची निवड झाली आहे. या चारही विद्यार्थिनी न्यू कॉलेजमध्ये शिकत आहेत. त्यांना प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, अमर सासने, संदीप पाटील, राहुल तिवले, प्रदीप साळोखे, दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड

कळे : शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय रग्बी स्पर्धेतून भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेसाठी कळेतील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाचे प्रणव पाटील, अजय पाचाकटे व शुभम पाटील यांची निवड झाली. वेणूताई चव्हाण कॉलेज कराड येथे झालेल्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत ५५ किलो वजनी गटात वैभव संभाजी पाटील याने सुवर्णपदक पटकावल्याने विद्यापीठ संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, क्रीडा विभागप्रमुख प्रा. विक्रम यमगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. कमलाकर रीक्षसि, संस्थाध्यक्ष विठ्ठल पाटील, उपाध्यक्ष राहुल पाटील यांचे सहकार्य लाभले.